MAHMAR 42198/2013
ISSN 2321-9572

त्रैमासिक

# सामाजिक अनुसंधान

वर्ष १ले • अंक १ला • सप्टें - डिसें-२०१३ • मूल्य १००रु.

• संपादक •
कैलास गणपतराव कानिंदे

Scanned by CamScanner

MAHMAR 42198/2013
ISSN 2321-9572

त्रैमासिक
# सामाजिक अनुसंधान

वर्ष 1 ले | अंक 1 ला | सप्टें-डिसें-2013

● संपादक : कैलास कानिंदे ●

● कार्यकारी संपादक ●

डॉ.सिध्दार्थ जाधव (बीड)
मनोज गिमेकर (भोकर)

● सहसंपादक ●

डॉ.सुभाष पवार (अमरावती)
प्रा.भारत कल्याणकर (अमरावती)
प्रा.संदिप गोरे (वसमत)
प्रा.व्यंकट कोरेबोईनवाड (जालना)
प्रा. राहुल पंडित (जुन्नर)
प्रा.लक्ष्मण डोंगरे (हिमायतनगर)
प्रा.साईनाथ बनसोडे (औरंगाबाद)
प्रा. सुभाष रगडे (नांदेड)

● संपादक मंडळ ●

प्रा.देवेंद्र नवसे (ठाणे)
प्रा.नामदेव डोंगरे (चिपळूण)
प्रा.भरत राठोड (पुणे)
प्रा.बालाजी विजापुरे (भोकर)
प्रा.शिंवाजी बल्लुरे (नांदेड)
प्रा.जी.एच.आडेराघो (नांदेड)
प्रा. श्रीनिवास पिलगुलवार (वरोरा)
प्रा. गणेश नरकुलवाड (पुणे)
प्रा. प्रकाश इंगळे (पुणे)
प्रा.संग्राम शिंदे (ठाणे)
धम्मपाल जाधव (भोकर)

● सल्लागार मंडळ ●

डॉ.के.सी. शेंडे
समाजशास्त्र विभाग प्रमुख, पीपल्स कॉलेज, नांदेड.
डॉ. डी.एच. किर्दक
चेअरमन, बोर्ड ऑफ स्टडी, समाजशास्त्र विभाग, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ,अमरावती
डॉ. संजय दुधे
चेअरमन, बोर्ड ऑफ स्टडी, समाजशास्त्र विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,नागपूर.
डॉ.ए.डी.चव्हाण
समाजशास्त्र विभाग प्रमुख, विद्याभारती महाविद्यालय,अमरावती.
प्रा.जे.टी. जाधव
मराठी विभाग, डी.बी.कॉलेज,भोकर,जि.नांदेड.
डॉ. बी.एन.गायकवाड
इंग्रजी विभाग प्रमुख,एन.जी. आचार्य आणि डी.के. .मराठे कॉलेज, चेंबूर (ई.) मुंबई.
डॉ. राजेंद्र गोणारकर
माध्यमशास्त्र संकुल, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
डॉ. आदिनाथ इंगोले
राज्यशास्त्र विभाग प्रमुख, गुरु बुध्दी स्वामी महाविद्याल

पत्रव्यवहारासाठी पत्ता :-
त्रैमासिक
सामाजिक अनुसंधान कार्यालय,
"मुक्ताई निवास" वनक्षेत्र कार्यालयाजवळ,
समतानगर, भोकर ता.भोकर जि.नांदेड.-431801
E-mail- Samajikanusandhan@gmail.com
Mob.No.9767044993
वार्षिक वर्गणी - 400 रु.
अंकाचे मूल्य -100 रु.

शोध निबंध पाठविण्यासंबंधी माहिती
1. शोध निबंध ई-मेल ने पाठवावा.
2. शोध निबंधाची सी.डी. व प्रिंट कॉपी फक्त पोस्टाने पाठवावी.
3. शोध निबंध हा MS-WORD-2007 मध्ये ISM-DVBTT-SUREKH Font Size-14 मध्ये टाईप केलेला असावा.
4.संदर्भसूची लेखकाचे नांव, ग्रंथाचे शीर्षक, प्रकाशन स्थळ, प्रकाशन वर्ष व पृ.क्र. असणे आवश्यक
5. शोध निबंधासोबत स्वतःचा असल्याचे पत्र स्वतःच्या सहीने पाठवावे.

सामाजिक अनुसंधान त्रैमासिक अंकातील लेखकांची/संशोधकाची मते ही त्यांची वैयक्तिक असून त्याबद्दल मुद्रक, मालक, प्रकाशक, संपादक मंडळ सहमत असतीलच असे नाही.

टिप :- कॉपीराईट विषयी आलेल्या तक्रारी बाबत संबंधित लेखांचे संशोधक, लेखक जबाबदार असतील. मुद्रक,मालक, प्रकाशक, संपादक मंडळ जबाबदार राहणार नाहीत.

Scanned by CamScanner

| अ.क्र. | शोध निबंधाचे शीर्षक | संशोधकाचे नाव | पृ.क्र. |
|---|---|---|---|
| ०१ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे 'जातीचे उच्चाटन' या विषयीचे विचार : एक समाजशास्त्रीय विश्लेषण | प्रा.डॉ.के.सी.शेंडे | ०१ |
| ०२ | भारतीय प्रसारमाध्यमे आणि दलित जाती | डॉ. राजेंद्र गोणारकर | ०३ |
| ०३ | महाराष्ट्रातील पायाभूत सुविधा सद्यःस्थिती आणि आव्हाने | प्रा.एस.आर.शिंदे | ०५ |
| ०४ | तृतीयपंथी समुदायाच्या समस्या | के.जी.कानिंदे | ०८ |
| ०५ | भारतीय समाजातील आद्य आणि कर्तबगार स्त्रिया : एक दृष्टीक्षेप | प्रा.एस.आर.बनसोडे | ११ |
| ०६ | आदिवासी समाजासमोरील नवीन आव्हाने | प्रा.पंडित आर.बी., प्रा. अनिल बडे | १५ |
| ०७ | भारतीय लोकशाही आणि निवडणूक सुधारणा | प्रा. एन.बी.डोंगरे | १८ |
| ०८ | मानवी अधिकारांची संकल्पना | प्रा. पंडित आर.बी. | २३ |
| ०९ | आश्रमशाळेतील आदिवासी विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास व मार्गदर्शन | प्रा. खिलारे संदीप सिताराम | २६ |
| १० | आदिवासी समाजाच्या सामाजिक समस्या | के.जी.कानिंदे, श्रीराम रावसाहेब वागदकर | २८ |
| ११ | संत तुकोबारायांचा सामाजिक संघर्ष | प्रा. प्रल्हाद परसराम जाधव | ३२ |
| १२ | दूरचित्रवाणीचे सामाजिक परिणाम | पुनम दादुसिंह गिरासे | ३४ |
| १३ | २१ व्या शतकातील आधुनिक स्त्रियांचे प्रश्न...! | प्रा. एस.आर.गोरे | ३७ |
| १४ | जागतिकीकरण :ग्रामीण भारतातील बदल व आव्हाने | प्रा.सौ.वर्षा के.नेहेते. | ४० |
| १५ | नांदेड़ जिल्ह्यातील भिल्लांची नृत्यकला | सुभाष रामराव रगडे | ४४ |
| १६ | आदिवासी विद्यार्थ्यांचे उच्च शिक्षणापासून वंचितीकरण | आडेराघो जी.एच. | ४६ |
| १७ | गांधीचा स्त्रीवादी दृष्टीकोन | प्रा.भारत व्ही.कल्याणकर | ५१ |
| १८ | सार्क : संरचनात्मक वाटचाल आणि आव्हाने | प्रा.भरत राठोड | ५३ |


Scanned by CamScanner

# आदिवासी समाजासमोरील नवीन आव्हाने

न पंडित (राज्यशास्त्र)
शिवछत्रपती
ालय,जुन्नर,जि.पुणे.

प्रा. अनिल बडे
शारिरीक शिक्षण संचालक
श्री. शिवछत्रपती
महाविद्यालय,जुन्नर,जि.पुणे.

**प्रस्तावना :-**

आधुनिक काळात जागतिक स्तरावर सातत्याने होत असलेल्या परिवर्तनाचा प्रभाव आज प्रत्येक एका राजकीय व्यवस्थेवर पडताना दिसतो. जागतिक स्तरावर खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण यासारख्या संकल्पनाचा स्वीकार आज प्रत्येक राष्ट्र करताना दिसते आणि या संकल्पनाचा प्रभाव आदिवासी समाजावर सुध्दा मोठ्या प्रमाणात पडला आहे. आदिवासी समाजाने पूर्वीपासून जीवन जगण्यासाठी अवलंबलेली संस्कृती वरील संकल्पनाच्या प्रभावाखाली येताना दिसते परंपरेने चालत आलेली संस्कृती व आधुनिक विचार यांचा घालमेल घालून एका संमिश्र संस्कृतीद्वारे आपला विकास करताना आदिवासी समाज दिसतो. भारतासहीत अन्य राजकीय व्यवस्थांनी तेथील आदिवासी समाजाचा विकास साध्य करण्यासाठी विविध प्रकारचे प्रयत्न केले आहेत. परंतु आज सुध्दा बदलत्या परिस्थितीनुसार आदिवासी समाजासमोर नवनवीन आव्हाने उभे राहताना दिसतात. आदिवासींचे प्रश्न किंवा समस्या एक तर त्यांच्या मूळ जीवन पध्दतीनुसार आहेत. तसेच बदलत्या काळानुसार नवीन निर्माण झालेल्या समस्या सुध्दा आहेतच. या समस्या सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक, आरोग्यविषयक अशा पध्दतीच्या आहेत.

**आदिवासी :-**

भारतामध्ये आदिवासी समूहांना अनुसूचित जमातीचा दर्जा देण्यात आला आहे. आदिवासींना आदिम जमाती,वनवासी, गिरीजन असे संबोधण्यात येते. सार्वत्रिक स्वरुपात एकाच प्रकारची मूल्ये, विचारप्रणाली यांची जोपासना करणाऱ्या समूहाला आदिवासी समुदाय असे म्हटले जाते. भारतीय राज्यघटनेत जमातीची व्याख्या देण्यात आलेली नाही. मात्र भारतीय राज्यघटनेच्या कलम ३४२ नुसार भारताच्या राष्ट्रपतीस असे अधिकार प्राप्त झालेले आहेत की, ते आवश्यकतेनुसार आदिवासी जमाती किंवा त्या अंतर्गत काही गट किंवा समूह यांना अनुसूचित जमाती म्हणून जाहीर करु शकतात. गिलीज या विचारवंताने आदिवासी जमातीचा अर्थ सांगताना असे म्हटले आहे की, जो पूर्व शिक्षित स्थानिक समुदाय, जो एकच भुप्रदेश व्यापतो एकच भाषा बोलतो आणि एकाच संस्कृतीचा अवलंब करतो त्या समुदायास आदिवासी जमात असे म्हटले जाते. आदिवासी याचाच अर्थ त्या- त्या ठिकाणचे मूळ रहिवाशी असाही होतो. म्हणजेच विशिष्ट एका भुप्रदेशात प्रामुख्याने डोंगराळ भागात राहणारा एकच बोली भाषा बोलणारा, एकच नाव धारण करणारा, सामाजिक, आर्थिक, बाबतीत साम्य असणारा व विशिष्ट संस्कृतीतून जीवन जगणारा समूह म्हणजे आदिवासी जमात होय.

भारतामध्ये १९९१ च्या जनगणनेनुसार अनुसूचित जमातीची लोकसंख्या ८०६.६४ लाख म्हणजे एकूण लोकसंख्येच्या ९.५५% इतकी होती. २००१ च्या जनगणनेनुसार भारतात अनुसूचित जमातीची लोकसंख्या आठ कोटी त्र्येचाळीस लाख एवढी होती. तर महाराष्ट्रात अनुसूचित जमातीची लोकसंख्या ८६ लाख एवढी होती. एकूण लोकसंख्येपैकी शेकडा प्रमाण भारतात ८.२ टक्के महाराष्ट्रात ८.९ टक्के एवढे होते. दर हजार पुरुषाच्या पाठीमागे संपूर्ण भारतात ९७८ स्त्रिया आढळल्या होत्या व महाराष्ट्रात हे प्रमाण ९७३ इतके होते. या समाजाची नागरी लोकसंख्या भारतात ८.२ टक्के व महाराष्ट्रात १२.७ टक्के एवढी आढळली आणि साक्षरतेचे प्रमाण संपूर्ण भारतात ४७.१ टक्के व महाराष्ट्रात ५५.२ टक्के एवढे आढळून आले. जनगणनेतील अहवालानुसार अनुसूचित जमातीची लोकसंख्या वाढताना दिसते. परंतु आज सुध्दा मोठ्या प्रमाणात आरोग्यविषयक सुविधा आदिवासी भागापर्यंत पोहचल्या नाहीत. त्यामुळे कुपोषित बालकाचे प्रमाण वाढलेले दिसते.

**आव्हाने किंवा समस्या :-**

आधुनिकीकरणाच्या किंवा जागतिकी करणाच्या प्रक्रियेत आदिवासी समाजाचा विकास होत आहे. हे खरे असले तरी त्याचे प्रमाण खुपच कमी आहे या समाजाचा विकास साध्य करण्यासाठी घटनात्मक तरतुद असली तरीही या समाजासमोर



Scanned by CamScanner

सर्वच बाबतीत अनेक समस्या आढळून येतात त्या खालील काही मुद्यांद्वारे स्पष्ट करता येतील.

**१) सामाजिक समस्या :-**

आदिवासी समाजासमोर सर्वात मोठी समस्या म्हणजे सामाजिक समस्या होय. समाजामध्ये परंपरेने चालत आलेल्या रिती-रिवाज, प्रथा, परंपरा यांचा प्रभाव आज सुध्दा दिसून येतो. समाजावर अंघश्रध्देचा प्रभाव मोठ्या प्रमाणात आहे. गावात असणारा भगत हा सर्वच समस्येवरचे उपाय सांगत असतो. परंतु ते संपूर्णतः अंधश्रध्देवर आधारीत असल्याने समस्यांचे समाधान होत नाही. जीवनात न उलगडणाऱ्या प्रश्नांसाठी धर्म व जादूटोणा याचा त्यांना आधार वाटतो. मानसिक शांतता मिळवण्यासाठी व्यावहारीक मूल्ये लक्षात न घेता केवळ अंधश्रध्देपाई अयोग्य नितिनियम पाळत असतात. आदिवासी समाजाचा बाह्य जगाशी संबंध आल्याने अनिष्ठ प्रथाचा शिरकाव मोठ्या प्रमाणात होऊन सांस्कृतिक मूल्यांला तडा गेला आहे. काही चांगल्या परंपरेवर म्हणजे आदिवासी समाजाची मूळ ओळख म्हणून ओळखल्या जाणाऱ्या संस्कृतीचे ऐहीकरण होऊ लागले. आधुनिक समाजाशी वाढलेल्या संपर्कामुळे गरीब- श्रीमंत किंवा इतर समाजापेक्षा आपण कनिष्ठ आहोत अशी न्युनगंडाची भावना वाढीस लागत आहे. प्रगत समाजाच्या संपर्काने आदिवासी धर्मांतराची समस्या निर्माण झाली आहे. आदिवासी विकास योजनेखाली काही संस्थेद्वारे छोटी मोठी विकासात्मक कामे आदिवासी भागात राबवली जातात.

**२) राजकीय समस्या :-**

भारतीय राज्यघटनेत केलेल्या आरक्षण तरतुदी नुसार आदिवासी समाज राजकीय पटलावर दिसू लागला आहे. धोरण निर्मितीत ही आदिवासी समाज पुढे येवू लागला आहे. परंतु आदिवासी समाजाचा म्हणावा तेवढा राजकीय विकास झाला नाही. राजकीय आरक्षणाचा फायदा घेऊन आदिवासी समाजातील मोजक्याच लोकांनी आपला विकास साध्य केला व बहुतांश समाज फायद्यापासून वंचित राहीला. पारंपारिक व्यवस्थेनुसार आदिवासी जमातीत एक प्रकारचे राजकीय संघटन होते. प्रत्येक जमातीमध्ये एक मंडळ असते. त्याद्वारे लोकावर नियंत्रण ठेऊन होणारे संघर्ष टाळले जात असत. पंरतु आता अस्तित्वात आलेल्या कायद्यामुळे जमातीच्या जा पंचायतीस अर्थ उरला नाही.

**३) आर्थिक समस्या :-**

पारंपारीक पध्दतीनुसार आदिवा समाजाचे अर्थाजन हे जंगलावर आधारीत हो जंगालातील शिकार, दारु गाळणे, मध, जंगलाती वस्तू, पदार्थ जमा करणे, जंगलात स्थलांतरीत शे करणे इ. बाबीद्वारे आदिवासी समाज अर्थाज करीत असत, परंतु सध्या स्थलांतरीत शेती पध्द जवळ जवळ बंद झालेली आहे. जंगल विषय कायद्यामुळे आदिवासींचे जंगलातून मिळण उत्पादन बंद झाले आहेत. पारंपारिक पध्दती वस्तुंची देवाण घेवाण करुन आदिवासी आपल गरजा भागवित असत. मात्र सध्या चल अर्थव्यवस्था अस्तित्वात आल्याने ही पध्दत ब पडली. आपल्या आर्थिक गरजा भागविण्यासा आदिवासी लोक सावकाराकडून व्याजाने पै घेतात. परिणामत: ते व्याज फेडण्यात त्यांचे संपू आयुष्यच खर्ची पडताना दिसते. अर्थाज करण्यासाठी सध्या आदिवासी समा कंत्राटदाराकडून रोज मजुरी करताना दिसतो. पर तिथे त्यांना मिळणारे दाम हे अत्यल्प अस बऱ्याच वेळा वेठ बिकारी पध्दतीचा वापर करु आदिवासींचे आर्थिक शोषण होत असते. व्यक्ती पर्यावरणात हस्तक्षेप केल्याने त्या जंगलाव आधारीत असलेला आदिवासी समाज हा आर्थि गरज भागविण्यासाठी शहराकडे जाताना दिसते तिथे सुध्दा त्यांच्या राहण्याच्या समस्या पासून मुलांच्या शिक्षणापर्यंत आधिक समस्या दिसतात शासनाने वन हक्क कायदा पास केला आहे. जमिनीचे हस्तांतरण थांबविले आहे. हस्तांतरणाच्या मनाईमुळे आदिवासी आपली जमीन बिग आदिवासींना विकू शकत नाही व आर्थिक परिस्थि कमजोर असल्याने त्या जमिनी तो कसू शक नाही. अशा वेळेस भाडेपट्याने किंवा कराराने त्य जमिनी इतरांना देऊन त्याच जमिनीत मजु म्हणून काम करताना दिसतात.

**४) शैक्षणिक समस्या :-**

आदिवासी समाजाचा विकास ज्या प्रमु बाबींवर अवलंबून आहे. त्यापैकी सर्वात महत्त्वा बाब म्हणून शिक्षणाकडे बघितले जाते. आदिवासींचा शैक्षणिक विकास करण्यासाठी शासनातर्फे अनेक



Scanned by CamScanner

योजना तयार केल्या आहेत. परंतु त्या योजनेद्वारे म्हणावे तेवढे उच्च दर्जाचे शिक्षण त्यांना मिळत नाही. शासकीय आश्रमशाळेत जेवणापासून इतर लागणाऱ्या अन्य वस्तूही शासनातर्फे पुरविल्या जातात. मात्र प्रत्यक्षात त्याचा लाभ आदिवासी विद्यार्थ्यांना मिळत नाही. शिवाय ज्या भाषेतून आदिवासींना शिक्षण दिले जाते त्यात त्यांच्या मुळ भाषेचा समावेश नाही. आदिवासी आश्रमशाळेत शिकविणारे शिक्षक हे स्थानिक ठिकाणी न राहता बाहेर गावात राहून नौकरी करतात. तसेच त्यांना स्थानिक आदिवासी लोकांची बोलीभाषा, संस्कृती इ. विषयी पुर्णतः माहिती नसते. ज्या आश्रमशाळांची निर्मिती करण्यात आली आहे. त्यांची अवस्था अत्यंत दयनिय झाली आहे. निकृष्ट दर्जाचे जेवण विद्यार्थ्यांना दिले जाते. पायाभूत सुविधांचाही मोठ्या प्रमाणात अभाव असतो. त्यामुळे आदिवासी विद्यार्थी चांगल्या दर्जेदार शिक्षणापासून वंचित राहतो व शहरातील विद्यार्थ्यासमोर स्वतःला कमकुवत समजतो.

**५) आरोग्यविषयक समस्या :-**

आदिवासी भागापर्यंत शासनाच्या योजना संपूर्णतः पोहचलेल्या दिसत नाही. मेळघाट, नंदूरबार, अमरावती व दुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासी लोकांचे आरोग्य दिवसेदिंवस खालावत असताना दिसते. कुपोषित बालकांच्या मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे गरोदर माताच्या मृत्यूचे प्रमाण ही वाढले आहे. आदिवासींच्या आरोग्यविषयक समस्यात दुषित पाणी, साथीचे आजार, वैद्यकीय उपचाराऐवजी भगत किंवा वैदुवरील असणारा विश्वास यामुळे रोगराई वाढली आहे. दुर्गम भागात राहत असल्याने सर्पदंश झाला किंवा आपातकालीन परिस्थिती निर्माण झाल्यास तात्काळ वैद्यकीय मदत मिळत नाही. बाहेरील जगाशी संपर्क आल्याने नवनवीन रोगांची लागण त्यांना होताना दिसते. उदा. अनैतिक शरीर संबंधामुळे एड्स सारख्या रोगांची लागण झालेली दिसते.

वरील विविध समस्या बरोबरच खोट्या आदिवासींची समस्या, औद्योगिकरणामुळे निर्माण झालेल्या समस्या, वाढती बेकारी, नैराश्य, भ्रष्टाचार इ. अनेक समस्या दिसून येतात.

**निष्कर्ष :-**

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत आदिवासी समाज बाहेरील जगाशी जोडला गेला आहे. परंतु पारंपारिक जीवन जगतांना आधुनिक जीवनात प्रवेश करतांना त्यांना अनेक नवीन आव्हानाचा सामना करावा लागत आहे त्या त्या राजकीय व्यवस्थांनी आदिवासी समाजाच्या जीवनमानाचा स्तर उंचावण्यासाठी पुरक परिस्थिती निर्माण केली आहे. परंतु ज्या गतीने त्यांचा विकास होणे गरजेचे होते त्या गतीने झाला नाही योग्य धोरणांची निर्मिती झाली असली तरी त्यांची योग्य प्रमाणात अंमलबजावणी झालेली नाही. आदिवासींच्या समस्यांचे निराकरण व्हावे असे जर वाटत असेल तर त्यांच्या मूळ संस्कृतीस धक्का न लावता त्या संस्कृतीस पुरक अशा धोरण निर्मितीच गरज आहे.

**संदर्भसूची :-**

१) महाराष्ट्रातील आदिवासी, डॉ. शौकन कुलकर्णी, डायमंड पब्लीकेशन, पुणे -२०११.

२) महाराष्ट्रातील आदिवासी, डॉ. गोविंद गारे, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था महाराष्ट्र राज्य.

३) महाराष्ट्राचे शासन व राजकरण, र. घ. वराडकर, निराली प्रकाशन, पुणे- २००८.

४) मराठी लोकांची संस्कृती, इरावती कर्वे, देशमुख प्रकाशन, पुणे -१९६२.

५) भारतीय आदिवासी, गुरुनाथ नांडगोंडे, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे.



Scanned by CamScanner